# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/08/2023 (गुरूवार) सकाळ


---

**पो.स्टे. एम. आय. डी. सी. बोरी येथील घरफोडीचा गुन्हा पाच तासा मध्ये उघड**

**स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई**



फिर्यादी नामे– अमित कृष्णकुमार सोराखे, वय ४६ वर्ष रा. मनिश नगर नागपुर यांचे टाकळघाट येथे किराणा दुकान हे मेन रोडवर असुन फिर्यादीच्या एम. आय. डी. सी बोरी कंपनी हद्दीत काजु बनविण्याचे प्रोसेस आर्यन ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनी असुन दिनांक ०२/०८/२०२३ रोजी ११/०० वा. दरम्यान फिर्यादी आपल्या काजु बनविण्याचे प्रोसेस कंपनी मध्ये गेले असता कंपनीच्या बाहेरील गेट उघडले असता कंपनीचे दोन शटरपैकी एक शटरचे लॉक तुटलेले होते. कंपनीतून १) काजु १० किलोचे ७२ बॅग २) काजु पॅकिट २५० ग्रॅम १०० पॅकिट ३) मोटर मशिन स्पेटर पार्ट केबल ४) वजन काटा कॅपीसिटी १०० किलो ५) पाउच सिलींग मशीन असा कोणीतरी अज्ञात आरोपीने मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरून पोस्टे एम. आय. डी. सी. बोरी येथे अप क्र. २९५/२३ कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि चा गुन्हा दाखल केला होता.

दिनांक ०२/०८/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सदर घरफोडीच्या गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना नागपूर उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय खबरी मार्फत मिळालेल्या माहितीनुसार **साहिल भास्कर नंदेश्वर वय १८ वर्ष** यास सापळा रचुन पथकाने ताब्यात घेतले असता विचारपुस दरम्यान त्याचे इतर साथीदारांसह त्याने वरील कंपनीमध्ये चोरी केल्याचे सांगितले वरून सदर गुन्हयातील इतर आरोपी नामे– **१) निलेश पांडुरंग निकोसे वय ३२ वर्ष, २) विजय संतोष यादव वय १८ वर्ष, ३) निकेश हरिश्चंद्र नेवारे वय २६ वर्ष तसेच ०३ विधीसंघर्ष बालक सर्व राहणार टाकळघाट** यांना ताब्यात घेतले असता त्यांनी मिळुन वरील नमुद गुन्हा केल्याचे सांगितले. १) खाकी रंगाच्या पोत्यामध्ये व मोठ्या प्लास्टिकच्या बरण्या मध्ये एकूण अंदाजे ८५ किलो काजु एकूण किंमती अंदाजे ४२,५००/–रुपये २) काजु पॉकेट २५० ग्रॅम एकूण किंमती अंदाजे २६००/– रुपये ३) एकूण ०५ इलेक्ट्रिक मोटर एकूण किंमती १०००००/– रुपये ४) सनसुई कंपनीचा २ वजन काटे एकूण किंमती १२,०००/– रुपये ५) ग्राइंडर

वेल्डिंग मशीन एकूण किंमती १०,०००/— रुपये ६) ब्लॅक डेकर कंपनीची सिलिंग मशीन एकूण किंमती ८,०००/— रुपये ७) गुन्हयात वापरलेली दोन मोटरसायकली एकूण किंमती १,३००००/—रुपये असा एकुण ३,०५,१००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरचा गुन्हा पाच तासात उघडकीस आलेला असुन नमूद चार इसमांची वैद्यकिय तपासणी करुन जप्त मुद्देमाल व कागदपत्रांसह पोलीस ठाणे एमआयडीसी बोरी यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोस्टे एमआयडीसी बोरी करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरिक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, पोलीस हवालदार महेश जाधव, नाना राऊत, मिलिंद नांदुरकर, अरविंद भगत, इक्बाल शेख, मयूर ढेकळे, पोलीस नायक, अमृत किनगे, रोहन डाखोरे, पोलीस शिपाई निलेश इंगुलकर, चालक सुमित बांगडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत देवकृपा स्टील राईस मिल तारसा ता. मौदा येथे दिनांक १३/०६/२०२३ चे ००.०० वा.ते दिनांक ३१/०७/२०२३ चे ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शैलेश कुमार छोटेलाल रॉय, रा. फ्रेंड्स कॉलनी काटोल रोड नागपुर यांनी लिलाव करून विकलेल्या देवकृपा स्टील प्राईस मिल तारसा येथून अज्ञात आरोपींनी १) रॅब्रो डिस्टनर मोटर किंमती २५०००/— रुपये प्रमाणे एकूण ५०,०००/— रुपये २) ब्लॉवर डूयर मोटर २० एच. पी एक नग किंमती अंदाजे २५०००/— रुपये ३) ब्लॅट कनवेअर मोटर तीन एच. पी दोन नग प्रत्येकी ५०००/— रुपये प्रमाणे १००००/— रुपये ४) पॅनल बोर्ड बॅनर प्रत्येकी किंमती ५००००/— रुपये प्रमाणे १०००००/— रुपये ५) जनरल पॅनल बोर्ड एक नग किंमती अंदाजे ५००००/—रू. ६) पाणी टाकी मोटर दोन नग प्रत्येकी ५०००/— रुपये प्रमाणे १००००/— रुपये व इतर ६ नग मोटार प्रत्येकी किंमती अंदाजे ५०००/— रुपये प्रमाणे ३००००/— रुपये असा एकूण २७५०००/— रुपयांचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गौतम मैश्राम मो. क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**